# अस्पृश्योध्दारक : राजर्षी शाहू महाराज

**प्रा. वाघमारे विष्णु बब्रुवान**
इतिहास विभाग प्रमुख,
श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी
जि. सोलापूर, ( महाराष्ट्र )

**प्रस्तावना :**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीच्या इतिहासात आपल्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय कार्याद्वारे अस्पृश्य व बहुजन समाजाला जागृत करणारे राजर्षी शाहू महाराज हे महात्मा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या नंतरचे ब्राह्मणेत्तरामधील महत्त्वाचे कर्ते समाजसुधारक होते.

आज आपण या महाराष्ट्राला पुरोगामी महाराष्ट्र म्हणतो, पण या महाराष्ट्रामध्ये दररोज अस्पृश्य, बहुजन बांधवावर अन्याय, अत्याचार होत असल्याचे आपणास दिसत आहे. तेंव्हा ही बाब पुरोगामी महाराष्ट्र म्हणून वारसा सांगणाऱ्यांना शोभणारी नाही. तसेच आज या पुरोगामी महाराष्ट्राच्या प्रतिमेला व संस्कृतीला मलीन करुन पेशवाई संस्कृतीच्या प्रतिगामी महाराष्ट्राचे स्वप्न पाहणाऱ्या शक्ती बळकट होताना दिसत आहेत. अशा अवस्थेत राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या सत्तेच्या माध्यमातुन अस्पृश्यांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी व समान हक्क मिळवून देण्यासाठी केलेल्या योगदानाचा आढावा घेण्याच्या हेतूने प्रस्तुत शोध निबंध तयार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या शोध निबंधाचा उद्देश म्हणजे अस्पृश्यांच्या प्रगतीसाठी, शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक सुधारणेच्या संदर्भातली राजर्षी शाहू महाराजांची भूमिका व योगदानाचा शोध घेणे हा होय. या शोध निबंधासाठी ऐतिहासिक विश्लेषणात्मक व मुल्यमापनात्मक पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. सदर शोध निबंध हा संपूर्णत : दुय्यम सामग्रीवर (Secondary Data) आधारित आहे.

महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा घेऊन राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक क्रांती कार्याची खऱ्या अर्थाने सुरुवात केली. कोल्हापूर संस्थानाचा कारभार आपल्या हातात घेतल्यानंतर या राजाने आपली सर्व शक्ती बहुजन व अस्पृश्योध्दाराच्या विकासासाठी वापरली. वेदोक्त प्रकरणावरुन खुद्द राजर्षी शाहू महाराजांना हिंदू समाजातील धार्मिक विषमतेची व अन्यायाची प्रथम जाणिव झाली. म्हणून ते धार्मिक सुधारणेकडे वळले व त्यांची ''धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या बाबतीतील शाहू महाराजांची भूमिका अधिक वास्तववादी व व्यवहारनिष्ठ होती.''[1] हे आपणाला दिसून येईल.

म्हणून त्यांनी आधुनिक शिक्षण हेच अस्पृश्यांच्या उत्थानाचे महत्त्वाचे साधन आहे हे ओळखून त्यांनी बहुजन समाजातील लोकांना इंग्रजी शिक्षण घेऊन नवीन समतावादी मूल्ये आत्मसात करुन उच्चवर्णीयांची बरोबरी साधून त्यांच्या जोखंडातून मुक्त होऊन आपला विकास साधावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यासाठी वस्तीगृहाची सोय, शिष्यवृत्ती देणे, अनेक संस्था स्थापन करुन त्यांना आर्थिक मदत करणे, संस्थाना देणग्या देणे महार, मांग, चांभार, ढोर, शिंपी, नाव्ही, मुसलमान इ. या जातीतील मुले शिकून तयार झाल्यानंतर त्यांना आपल्या संस्थानातील वेगवेगळया खात्यामध्ये नेमले तसेच सर्व जातीतील लोकांना आपल्या स्व–हक्काची जाणीव करुन दिली अस्पृश्यांच्या शिक्षणाच्या हक्काच्या संदर्भात शाहू महाराजांनी 24 नोव्हेंबर 1911 रोजी सर्वात महत्त्वाचा आदेश काढून संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले. राजर्षी शाहू महाराजांनी 1918–19 पासून आपल्या संस्थानातून अस्पृश्योध्दाराच्या कार्याला गती व दिशा दिली. 28 सप्टेंबर 1919 रोजी महाराजांनी अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद केल्याचा आदेश जारी केला व त्यात ते म्हणतात, ''करवीर इलाख्यात (जहागिरी सोडून) अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा असतात त्या सर्व येत्या दसऱ्यापासून बंद करण्यात याव्यात व अस्पृश्यांच्या मुलांस सरकारी शाळांतून इतर लोकांच्या मुलांप्रमाणेच दाखल करुन घेत जावे सरकारी शाळांतून शिवा–शिव पाळण्याची नसल्याने सर्व जातींच्या व धर्माच्या मुलांस एकत्र बसविण्यात येत जावे.''[2]

अस्पृश्यांना शिक्षणाच्या संदर्भात उच्चवर्णीयांच्या बरोबरीने आणण्यासाठी फार मोठे क्रांतीकारी निर्णय घेतले.

राजर्षी शाहू महाराजांनी 1918 नंतर अस्पृश्यांच्या मुक्तीसाठी वेगवेगळे जाहिरनामे काढले कारण त्या काळात अस्पृश्यांना त्यांच्या प्रगतीच्या दृष्टीने अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते. त्या सर्व बाबींचा त्यांनी बिमोड केला. '' वतनदारी आणि इनामदारी ही प्रगतीच्या पायातील धोंड आहे. तिचा काटा शाहू महाराजांनी प्रथम काढला. 1918 साली वतनदारी नाहीशी करण्याचा कायदा त्यांनी पास केला. त्यातच शाहू महाराजांनी महारांची वतने (20 व्या शतकातील गुलामगिरी) नष्ट करुन वतनदार – गाव – कामगार महार हा सरकारी गावकीच्या व रयतेच्या रोजच्या गुलामी कामातून मुक्त केला. त्यांनी खऱ्या क्रांतीकार्याची मुहर्तमेढ रोवली. महारांची वतने रद्द करुन, त्यांच्या जमिनी रयताव करुन इतर शेतकऱ्यांच्या पातळीवर महार वर्गाला आणले. (महारांच्या) त्यांच्या जमिनी रयताव केल्या त्यांच्याकडून सक्तीने काम करुन घेण्यास बंदी करण्यात आली असे 25 जून 1918 रोजी त्यांनी फर्मानच काढले. 3 मार्च 1919 रोजीच्या नव्या हूकूमाने बलुतेदारी पध्दतीलाही आळा घातला. अस्पृश्यांची वेठबिगार कायद्याने बंद केली. सार्वजनिक विहीरी, तळी, पाण्याचे नळ, धर्मशाळा, दवाखाने, शाळा व कचेऱ्या या ठिकाणी अस्पृश्य वर्गाला वावरण्याचे व उपभोग घेण्याचे समान हक्क दिले.''[3] तसेच शाहू महाराजांनी मानव जातीला कलंक असलेल्या अस्पृश्यते सारख्या रुढीचे उच्चाटन करण्यासाठी 1 जानेवारी 1919 महसूल व न्याय खात्यासंबंधी दोन जाहिरनामे मंजूर केले व त्यात ते म्हणतात. ''कोल्हापूर इलाख्यातील रेव्हिन्यू, ज्युडिशियल आदि करुन सर्व अधिकाऱ्यांनी आमच्या संस्थानात जे अस्पृश्य नोकरी धरतील त्यांना प्रेमाने व समतेने वागविले पाहिजे. जर कोणा अधिकाऱ्यांनी वरील प्रमाणे अस्पृश्यांना वागविण्याची इच्छा नसेल त्याने हा हुकूम पोहचल्यापासून सहा आठवडयांच्या आत नोटिस देवून राजीनामा द्यावा. त्याला पेन्शन मिळणार नाही. आमची इच्छा आहे की, आमच्या राज्यातील कोणाही इसमाला जनावराप्रमाणे न वागविता मनुष्य प्राण्याप्रमाणे वागवावे ... आमच्या अधिकाऱ्यांनी मिशनरी आर्य समाजिष्ट, रेल्वे व गव्हर्नमेंट अधिकाऱ्याचे हया बाबतीत अनुकरण करावे.''[4] अशा पध्दतीने महाराजांनी अस्पृश्यता निवारणेच्या संदर्भात

आपल्या सत्तेच्या हुकूमनाम्याने विधायक वळण दिले व जरब निर्माण करुन दलित मुक्तीच्या बेडया सैल केल्या असे आपणास दिसून येईल. ''महाराष्ट्रातील अस्पृश्यांच्या चळवळीस व्यापक व चिरायू स्वरुप जर कोणी दिले असेल तर, ते राजर्षीनी होय.''[5]

म्हणून अस्पृश्य उध्दारासाठी प्रत्यक्ष कृतीतून शाहू महाराजांनी आपले जीवन पणाला लावले याची अनेक उदाहरणे आपणाला त्यांच्या चरित्रातून पहावयास मिळतात. विशेष म्हणजे, ''ज्यांच्या हातात सत्ता आहे अशा पुरुषाने अस्पृश्यता निवारण करणे याला फार महत्त्व आहे. त्या दृष्टीने विचार करता कोल्हापूरचे राजे शाहू महाराज यांचे अस्पृश्यता निवारण्याचे कार्य फारच मोलाचे आहे. हाती राजसत्ता असलेल्या राजाने किंवा सत्ताधिकाऱ्याने अस्पृश्यता निवारण करणाऱ्या भारतात पहिलेच शाहु महाराज होते.''[6]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अस्पृश्यांच्या नेतृत्वाच्या रुपाने उदय होण्या अगोदर राजर्षी शाहू महाराजांना खंत वाटत होती की, अस्पृश्यांच्या दुःखांना वाचा फोडणारा वाली कोणी नाही परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहू महाराजांची भेट घडून आल्यानंतर त्यांना फार आनंद वाटला. आपला आनंद व्यक्त करताना, 1920 मध्ये मानगांव, या ठिकाणी भरलेल्या परिषदेत म्हणतात, ''तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधुन काढला, ह्या बद्दल मी तुमचे अंतःपुर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की, डॉ. आंबेडकर हे तुमचा उध्दार केल्याशिवाय राहणार नाही.''[7]अशा प्रकारच्या वरील विधानावरुन राजर्षी शाहुची दूरदृष्टी किती अचूक होती हे आपणाला इतिहासाने दाखवून दिले आहे.

महाराजांच्या अस्पृश्य उध्दाराच्या कार्याविषयी अस्पृश्य समाजाच्या अंतःकरणात फार मोठा आदरभाव होता. याचे वर्णन करताना राजर्षी शाहू महाराजांचे चरित्रकार धनंजय कीर म्हणतात की, '' शाहूच्या ह्या अलौकिक प्रेमामुळे व निष्ठेमुळे त्यांना मागासवर्गीय व अस्पृश्य मानलेले वर्ग देवासमान मानीत होते. गौतमबुध्द, महात्मा फुले व आंबेडकर यांना ते जसे पुज्यनीय मानीत तसेच शाहूनां ते आपला उध्दारकर्ता म्हणून पूजनीय मानीत.''[8]अस्पृश्यता निवारण, पददलित समाजात शिक्षणाचा प्रसार व समाजिक

समानतेची प्रस्थापना हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शाहू महाराज यांच्या मैत्रीचा सर्व सामान्य दुवा होता. लंडनहून राजर्षी शाहूंना उद्देशून लिहिलेल्या दि. 4 सप्टेंबर 1921 च्या पत्रात डॉ. बाबासाहेब कळवळून म्हणतात, "We need you ever so much for you are the pillar of the great movement towords social democracy which is making its headway in India."[9] महात्मा फुले व राजर्षी शाहु महाराज यांच्या अस्पृश्य उध्दाराच्या चळवळीची सर्वस्वी धुरा ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतल्यानंतर राजर्षी शाहू महाराजांच्या अस्पृश्योध्दाराच्या कार्याविषयी त्यांनी अत्यंत कृतज्ञतेने उद्गगार काढलेले आहेत की, ''शाहू महाराजा सारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हता व पुढे लाभेल की नाही याबद्दल आम्हास शंका आहे.''[10] यांच्या पेक्षा राजर्षी शाहू महाराजांच्या अस्पृश्योध्दाराच्या कार्याचा उचित गौरव कोणता असेल.

## निष्कर्ष :

एकंदरीत महात्मा फुलेंच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा घेऊन राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या मुक्तीच्या कार्याची अंमलबजावणी केली. समाजातील जातिभेद, अस्पृश्यता, श्रेष्ठ–कनिष्ठता व चार्तुर्याधिष्ठित समाजरचना नष्ट करण्यासाठी त्यांनी मनापासून कृतीशिलपणे कार्य केले. त्यांचा क्रांतीकारी निर्णय म्हणजे 26 जुलै 1902 मध्ये कोल्हापूर राज्य कारभारामध्ये मागासवर्गीयांना 50 टक्के जागा आरक्षित करुन 1917 मध्ये 'समानतेचा कायदा' शाहू महाराजांनी पास केला हे होय. तसेच सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना मोकळीक देऊन समान हक्क दिले. दलितांना नोकऱ्या व स्वतंत्र प्रतिनिधीत्व मिळवून दिले. शाहू महाराजांचे हे सर्व निस्पृह मनातून केलेले कार्य म्हणजेच अस्पृश्यांच्या मुक्तीचा विचार आणि कृती होय.

## संदर्भ व टीपा


1. नलिनी पंडित, जातिवाद आणि वर्गवाद, लोकवाङमय गृह, मुंबई–25, तिसरी आवृत्ती–1 जानेवारी 1996, पृष्ठ – 72
2. डॉ. जयसिंगराव पवार (संपादक), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती –26 जून 2007, पृष्ठ–74
3. शंकरराव खरात, अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे – 30, द्वितीय आवृत्ती – 3 मे 2004, पृष्ठ – 10
4. डॉ. जयसिंगराव पवार (संपादक), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती –26 जून 2007, पृष्ठ–81
5. चां. भ खैरमोडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीची पार्श्वभूमी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे – 30, प्रथम आवृत्ती – 18 एप्रिल 1988 पृष्ठ–186.
6. शंकरराव खरात, अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे – 30, पृष्ठ – 13
7. डॉ. जयसिंगराव पवार (संपादक), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती –26 जून 2007, पृष्ठ–97
8. धनंजय कीर, राजर्षी शाहू महाराज, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई – 34 द्वितीय आवृत्ती – 1992, पृष्ठ 431.
9. डॉ. जयसिंगराव पवार (संपादक), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती –26 जून 2007, पृष्ठ–925
10. प्रदिप गायकवाड (संपादक), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत व मूकनायक अग्रलेख, क्षितिज पब्लिकेशन, नागपूर –17 चतुर्थ आवृत्ती –2006 पृष्ठ–104 (अग्रलेख – दि. 4 नोव्हेबर 1927)